# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २४, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

### ठाण्यातील पेमेंट गेटवे सुविधा उपलब्ध करुन देण्याऱ्या कंपनीच्या बँक खात्यातून अनधिकृतरित्या रक्कम हस्तांतरित केल्याबाबत

**(१) * ७२३८८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये असलेल्या पेमेंट गेटवे आणि पेआऊट सुविधा देणाऱ्या एका कंपनीचे बँक खाते हॅक करुन २४१ वेगवेगळ्या बँक खात्यांमधून १६१८० कोटी रूपयांचे ऑनलाईन व्यवहार करुन त्या रक्कमा परदेशात पाठविल्याचे तसेच २५ कोटीं रूपयांची फसवणूक केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गुन्ह्याचा तपास ठाणे पोलीसांच्या सायबर सेल तथा नौपाडा पोलीस ठाण्याकडून करण्यात आला असून तपासात काही आरोपींनी विविध व्यक्तींच्या नावे संस्था स्थापन करणे तसेच बनावट नोटराइज्ड भागीदारी करार बनवून बँकेत खाती उघडणे, हॅकर्स पेमेंट गेटवे मध्ये प्रवेश मिळवून संवेदनशील डेटा, क्रेडिट कार्ड क्रमांक, ग्राहकांची नावे व पत्ते चोरी करुन आर्थिक व्यवहार केल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या व्यवहारांची उच्च स्तरावरून सखोल चौकशी करुन दोषी कंपन्या व यात सहभागी व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच फसवणूक झालेल्यांना त्यांच्या रकमांचा परतावा देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये असलेल्या पेमेंट गेटवे सुविधा पुरवणा-या एका कंपनीच्या बँक खात्यातून २५ कोटी रुपये अनधिकृत मार्गाने विविध बॅंकांच्या विविध खातेधारकांना हस्तांतर करुन कंपनीचे फसवणूक करुन नुकसान केल्याबाबत श्रीनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे गु.र.क्र.१४८/२०२३ भा.दं.वि कलम ४२०, ४०९, १२० (ब), ३४ सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६५, ६६, ६६(क), ६६(ड) अन्वये दि.१६.०६.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

नौपाडा पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये १० भागीदारी संस्था स्थापन करून त्या सारख्या इतर अनेक भागीदारी संस्थेच्या नावे सुमारे ९७ बनावट नोटराईज्ड करारनामे तयार करून त्या आधारे विविध बँकांमध्ये सुमारे २६० पेक्षा जास्त बॅक खाती उघडून अंदाजे रु. १६१,८०,४१,९२,४७९/- (१६ हजार १८० कोटी, ४१ लाख, ९२ हजार, ४७९ रूपये) एवढया रकमेची उलाढाल करून शासनाची फसवणुक करून सदर व्यवहारातील रक्कम युएसडी चलनाद्वारे व नियमित बँक व्यवहाराद्वारे गैरकायदेशीर मार्गाने विदेशात पाठविल्या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि.०६.१०.२०२३ रोजी गु.र.नं.२९४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२०,४०९, ४६७, ४६८, १२०(ब), ३४ सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६६(सी), ६६(डी) प्रमाणे स्वतंत्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदर प्रकरणी सद्यास्थितीत एका भागीदारी संस्थेचे दोन भागीदार व दोन कंपन्याचे दोन संचालक यांना अटक करण्यात आलेली असून एकूण ११ आरोपींतांना अटक करण्यात आलेली आहे. आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे व सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) सदर बाबत तपास चालू आहे.

-----------------

**नालासोपारा (जि.पालघर) येथे विजयी भव नावाने खाजगी पोलिस प्रशिक्षण केंद्र चालविणाऱ्या पोलिसांनी मुलींचे लैगिंक शोषण केल्याबाबत**

**(२) * ७३१९० श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) येथील विजयी भव या नावाने चालविण्यात येणाऱ्या खाजगी पोलिस प्रशिक्षण केंद्रावर पोलीस भरती प्रशिक्षणाच्या नावाखाली चालकांकडून मुलींचे लैंगिक शोषण होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिडीत मुलींच्या कुटुंबियांनी पोलिसांकडे तक्रारी केल्या असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित पोलीस कर्मचारी व सह महिला पोलीस कर्मचारी यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निलंबित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कारवाई करणेसह अशा प्रकारच्या खाजगी पोलीस प्रशिक्षण केंद्रांवर नियंत्रण आणण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी नालासोपारा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३७३/२०२३, भा.द.वि.स. कलम ११४, ३५४(ए), ३५४ (डी) सह पोस्को ॲक्ट ८, १२, १७, आयटी ॲक्ट ६७ (ए), ६६ (सी) अन्वये दि.०९.०८.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी संबंधित पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) सदर गुन्ह्यात खाजगी पोलीस ॲकेडमी चालविणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व पोलीस घटकात पोलीस ठाणे पातळीवर पोलीस काका, पोलीस दीदी संकल्पना राबवून शैक्षणिक ठिकाणी भेटी देऊन महिला व बालकांवरील अत्याचाराबाबत जागृती करण्यात येत आहे. महिला व मुलींची छेडछाड रोखण्यासाठी महिला छेडछाड विरोधी पथके स्थापन करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक रोड (जि.नाशिक) येथील एका कारखान्यात मुंबई पोलिसांनी एमडी ड्रग्ज हस्तगत केल्याबाबत**

**(३) * ७१७६८ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे, नाशिक, सोलापूर, पालघर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई येथे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान अंमली पदार्थांचे कोट्यावधी रुपयांचे साठे आढळून आले असून नाशिक रोड येथील एका कारखान्यात तसेच छत्रपती संभाजीनगर शहरातील कांचनवाडीतील एका आलिशान बंगल्यातून व पैठण एमआयडीसीतील एका कंपनीतून पोलिसांनी सुमारे ३०० कोटी रुपयांचा अंमली पदार्थांचा साठा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे येथील ससून रुग्णालयाच्या गेटवरुन २ कोटी १४ लाख रुपयांचे मॅफेड्रॉन हे अंमली पदार्थ पोलिसांकडून जप्त करण्यात आले असून रुग्णालयात उपचारार्थ दाखल असलेल्या ललित पाटील या आरोपीकडून हे पाठविण्यात येत असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अंमली पदार्थांची तस्करी करणारा आरोपी व या रॅकेटचा सुत्रधार ललित पाटील याला गेल्या १६ महिन्यांपासून कोणताही गंभीर आजार नसतानाही वैद्यकीय कारणास्तव रुग्णालयात दाखल करण्यात येवून तो रुग्णालयाशेजारील पंचतारांकित हॉटेलातून अंमली पदार्थाची कोट्यावधी रुपयांची तस्करी रुग्णालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या आर्थिक संगनमताने करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आरोपीने मी स्वत: पळालो नसून मला पळविण्यात आल्याचे प्रसार माध्यमासमोर सांगितले असून या प्रकरणी राजकीय पाठबळ असल्याचा संशय व्यक्त होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात ड्रगच्या या रॅकेटमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी व्यक्ती तसेच सहभागी असणारे अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दि.०१.१०.२०२३ रोजी एन.डी.पी.एस. अधिनियम १९८५ चे कलम ८(सी), २२(सी), २९ व भा.दं.वि.कलम २०१ आणी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii), ३(२), ३(४), ३(५) व ४ अन्वये दाखल गु.र.नं.३०६/२०२३ मध्ये रु.२,१४,३०,६००/- किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

नाशिक आयुक्तालयातील नाशिक रोड पोलीस ठाणे येथे येथे दि.०८.१०.२०२३ रोजी गु.र.न.४६०/२०२३ एन.डी.पी.एस. अधिनियम १९८५ चे कलम ८(सी), २२(सी), २९ अन्वये गुन्हा दाखल केला असुन रु.०५,८४,४०,०००/- रूपये किंमतीचा ४.८७० कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच रु.०५,९४,६०,३००/- इतक्या किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ बनविण्याकरीता लागणारा कच्चा माल व इतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

मुंबईतील साकिनाका पोलीस स्टेशन येथिल दि.०८.०८.२०२३ रोजी गु.र.क्र.७८७/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(सी) सह २२(सी), २९,२७(सी), २५ व भारतीय हत्यार कायदा चे कलम ३,२५ तसेच म.पो.का. चे कलम ३७(१)(अ), १३५ अन्वये गुन्हा दाखल असुन त्यांतर्गत २० आरोपींना अटक करुन त्यांच्याकडुन रु.३२५ कोटी ५५ लाख १० हजार इतक्या रकमेचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.
(२) बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दि.०१.१०.२०२३ अन्वये दाखल गु.र.नं.३०६/२०२३ मध्ये जप्त करण्यात आलेले रू.२.१४ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ हे ससुन हॉस्पिटल च्या समोर आंबेडकर पुतळयाच्या कंपाऊड लगत असलेल्या बस स्टॅाप शेजारी सार्वजनीक ठिकाणी रोड वरुन जप्त करण्यात आले आहेत.
(३) ललित पाटील हा Pulmonary T.B., Morbid Obesity with Incisional Hernia या व्याधिने ग्रस्त होता. दि.२१.१०.२०२२ पासून ते दि.०२.१०.२०२३ पर्यंत दोन विविध कालावधीत एकुण ६ महिने ४ दिवस ससुन रुग्णालय येथे उपचार घेत होता. बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दि.०१.१०.२०२३ अन्वये दाखल गु.र.नं.३०६/२०२३ मध्ये न्यायबंदी आरोपी ललित पाटील याने रुग्णालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या आर्थिक संगनमताने करीत असल्याचेही बाबत तपासात अद्द्याप निष्पन्न झालेले नाही.
(४), (५) व (६) बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दि.०१.१०.२०२३ गु.र.नं. ३०६/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन ललित पाटील व इतर १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे दि.०३.१०.२०२३ गु.र.नं.३०८/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन न्यायबंदी आरोपीच्या संरक्षण कामी नेमण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी कर्तव्यात हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याने ४ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना भारतीय राज्यघटना अधिनियम कलम ३११ (२)(ब) अन्वये शासकीय सेवेतून बडतर्फ केले असून ६ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.

संचालक वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीच्या अहवालानुसार व आयुक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांच्या अभिप्रायानुसार सदरची घटना गंभीर स्वरुपाची असल्यामुळे व तपासात अडथळा न होण्याच्या दृष्टिने अधिष्ठाता यांना कार्य मुक्त करण्यात आले आहे. तसेच पथक प्रमुख, अस्थिव्यंगोपचारशास्त्र यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. अधिष्ठाता, पथक प्रमुख,

अस्थिव्यंगोपचारशास्त्र तसेच इतर विभागातील संबधितांविरुद्ध म. ना. से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालवधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) शहरी व ग्रामीण भागातील वीज पुरवठा अखंडित करण्याबाबत

**(४) * ७१९११ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि. रायगड) येथे शहरी व ग्रामीण भागात वारंवार वीज खंडीत होत असल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे वीज खंडीत होण्याच्या प्रकारात वाढ होत असून उक्त विभागात दररोज विजेचा दाब सातत्याने कमी जास्त होत असल्यामुळे महागड्या विदयुत उपकरणांवर त्याचा विपरित परिणाम होऊन नागरिकांना नाहक भूर्दंड सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही,

तथापि, पनवेल तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात माहे ऑक्टोबर-२०२३ मध्ये वीजपुरवठा खंडीत होण्याच्या ११ घटना घडल्या आहेत. तसेच माहे ऑक्टोबर-२०२३ वा त्यादरम्यान पनवेल शहर विभागाअंतर्गत येणाऱ्या पनवेल तालुक्याच्या शहरी व ग्रामीण भागात विजेच्या कमी वा जास्त दाबामुळे विद्युत उपकरणांवर परिणाम होऊन नागरिकांना भुर्दंड सहन करावा लागत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) पनवेल तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागासाठी अखंडित वीज पुरवठा करण्याकरीता महावितरणामार्फत गरजेनुसार वीज वितरण व्यवस्था सक्षमीकरण करण्याकरीता पायाभूत आराखडा तसेच इतर केंद्र शासनाच्या योजनांतून रोहित्रे क्षमता वाढ, नविन रोहित्रे, जिर्ण झालेले खांब बदलणे, कमी दाबाचा वीज पुरवठा होणाऱ्या ठिकाणाचे विज खांब व तारा बदलणे इ. कामे हाती घेतली जातात.

पनवेल तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागास अखंडीत वीज पुरवठा करण्याकरीता विविध योजनेअंतर्गत यापूर्वी अंदाजे रु.२५४.११ लाख खर्च करण्यात आले असून, उर्वरित रु.४८०.४० कोटी ची कामे सुधारीत वितरण क्षेत्र योजनेच्या (RDSS) अंतर्गत प्रस्तावित केलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेच्या ‘भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी’ वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्याने लाच घेतल्याबाबत

**(५) * ७१९९६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ‘भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाच्या’ अधिष्ठात्याला व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश मिळवून देण्यासाठी २० लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, महाविद्यालयाच्या व्यवस्थापन कोट्याच्या १५ जागा असतांना सन २०२२-२३ मध्ये २२ विद्यार्थ्यांना व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येऊन समितीच्या चौकशीचा अहवाल तंत्रशिक्षण संचलनालयाकडे पाठविला असल्याचे निदर्शनास आले असून व्यवस्थापन कोट्याच्या प्रवेशासाठीच्या प्रक्रियेत बहुतांश कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रियेच्या नियम क्रमांक १३ नुसार प्रवेश झाले नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबधित दोषींवर कारवाई करुन अशा प्रकारांना आळा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी निश्चित केलेल्या यादीनुसार तक्रारदार हे त्यांच्या मुलासह गेले असता अधिष्ठाता यांनी नॉन एन. आर. आय. (Non NRI) कोट्यातून प्रवेश देण्याचे भासवून फी व्यतिरिक्त रक्कम रु.१६ लाख ची मागणी तक्रारदार यांच्याकडे केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदविली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन अधिष्ठाता, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय यांना रक्कम रु.१० लाख ची लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

त्यानुषंगाने संबंधित अधिष्ठाता यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्यात आरोपी अधिष्ठाता यांना दिनांक ०९/०८/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणात तत्कालीन अधिष्ठाता यांच्या गैरवर्तणुकीबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत दिनांक १०/०८/२०२३ च्या आदेशान्वये उपायुक्त (दक्षता विभाग), पुणे महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने अधिष्ठाता यांच्या प्रथम वर्ग प्रवेश प्रक्रियेतील केवळ सन २०२३-२४ गैरवर्तणूकीबाबत अहवाल दिलेला आहे. त्यामुळे सन २०२२-२३ मध्ये मॅनेजमेंट कोट्यातील प्रवेशाबाबतची बाब या समितीच्या चौकशीत नाही. तसेच या चौकशीचा कोणताही अहवाल पुणे महानगरपालिकेमार्फत तंत्रशिक्षण संचालनालयाकडे पाठविण्यात आलेला नाही.

(४) सदर प्रकरणी तत्कालीन अधिष्ठाता, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय यांनी वैध परिश्रमाखेरीज अन्य पारितोषण म्हणून भ्रष्ट बेकायदेशीर मार्गाने पदाचा गैरवापर करुन आर्थिक फायदा मिळवून गुन्हेगारी स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध दिनांक ०९/०८/२०२३ रोजी आरोपी अधिष्ठाता यांच्याविरुद्ध फरासखाना पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु.र.क्र १४२/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयात दिनांक ०९/०८/२०२३ रोजी आलोसे यांना अटक करण्यात आली आहे. प्रस्तुत गुन्ह्याचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्याकडून सुरु आहे.

तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले असून या ॲपवर लाचेची मागणी, अपसंपदा व इतर भ्रष्टाचाराचे गुन्हे याबाबत तक्रार केली जावू शकते.

(२) राज्यातील जनतेकरिता लाचखोरांविरुद्ध तक्रारी करणे सोपे व्हावे म्हणून लाचलुचपत्त प्रतिबंधक विभागामार्फत टोल फ्री क्रमांक १०६४ ही हेल्पलाईन तसेच Whatsapp क्रमांक ९९३०९९७७०० कार्यान्वित करण्यात आला आहे.

(३) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत फेसबुकवर अकांऊट निर्माण करण्यात आले असून त्यावर सापळा, अपसंपदा व इतर भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यांबाबत माहिती प्रसिद्ध करुन जनजागृती केली जाते.

(४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कार्यपध्दती संबंधी FM Radio, दुरदर्शन यावर परिसंवाद आयोजित करुन जनजागृती केली जाते.

(५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सर्व शासकीय कार्यालयांच्या दर्शनी भागावर ला.प्र.वि. संबंधी माहिती बोर्ड लावून प्रदर्शित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबारचे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी शेतजमीनीशी संबधित अनेक प्रकरणांमध्ये केलेला गैरव्यवहार

**(६) * ७२९०७ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबारचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.बालाजी मंजुळे यांनी शेतजमीनीशी संबधित अनेक प्रकरणांमध्ये अनियमितता करून १० कोटी ८२ लाख ६४ हजार रुपयांच्या शासनाच्या महसूलाचे नुकसान केल्याचे दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात नंदुरबार शहर पोलिसात तहसीलदारांनी तक्रार देऊन गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

प्रश्नाधीन घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी तहसिलदार, नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नंदुरबार शहर पोलीस स्टेशन, नंदुरबार येथे गु.र.न. ७९२/२०२३ भा.दं.वि. कलम १६७, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) प्रमाणे दि.०४.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यात २० आरोपी निष्पन्न झाले असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीसांकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) निम्न ज्ञानगंगा - २ बृहत लघु पाटबंधारे योजनेअंतर्गत केलेल्या धरणाच्या भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(७) * ७३२१२ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील निम्न ज्ञानगंगा-२ बृहत लघु पाटबंधारे येजना या प्रकल्पास रु.१६७ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन सदर धरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाच्या भिंतीसाठी पाया न खोदता केलेल्या निकृष्ट बांधकामामुळे धरण १०० टक्के भरल्यावर धरणातील पाणी भिंतीमधून झिरपून रोहणा तसेच आजुबाजूच्या गावातील शेतकऱ्यांच्या शेतात जावून शेतीचे नुकसान होत असून कोणत्याही क्षणी धरण फुटून जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग व जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच निकृष्ट बांधकाम करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) निम्न ज्ञानगंगा-२ बृहत लघु पाटबंधारे योजना, ता. खामगाव, जि. बुलडाणा या प्रकल्पास महामंडळाचे निर्णय क्र. विपाविमा/कातां-३ (लपा)/(धा.क्र. ४५/२००८)/ ७१/निम्न ज्ञानगंगा प्रथम सुप्रमा/२०१६, दि. २९.०३.२०१९ नुसार रु.१५९.५५ कोटी रूपये किंमतीची प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. जुन-२०१९ मध्ये प्रकल्पाची घळभरणी करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही. धरणाच्या भिंतीच्या पायाच्या खोदकामाची खोली संकल्पित पाया पातळीपर्यंत खोदकाम करून पाया भरणी करण्यात आलेली असून कामाची गुण नियंत्रण विभागाकडून वेळोवेळी पाहणी करण्यात आलेली आहे.

शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसानी पंचनामे करण्यात आलेले असून नुकसान भरपाईसाठी आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) व (४) धरणाच्या खालील बाजुस असलेल्या जमिनीच्या पाणीपातळीत वाढ होऊन दलदल निर्माण होत आहे. सदर पाणी पातळी वाढीची कारणे शोधण्याकरीता जल संसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण विभाग, केंन्द्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, खडकवासला, पुणे (CWPRS, PUNE) यांच्या कडून सदर धरण स्थळाची दि.०५/०९/२०२३ व दि.०६/०९/२०२३ रोजी पाहणी करण्यात आलेली आहे. सदर पाहणी अहवालातील नमुद चाचणी घेण्याच्या कामास मान्यतेकरीता आवश्यक प्रक्रिया प्रगतीत आहे. याबाबत अहवाल प्राप्त होताच पुढील उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसानीचे पंचनामे करण्यात आलेले असून नुकसान भरपाईकरिता आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील बहुतांश झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये (एसआरए) झालेला गैरव्यवहार**

**(८) * ७१९२७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टीवासियांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध योजनांव्दारे पुनर्वसन प्रकल्प राबविले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजना अंमलात आली तेव्हा मुंबईत झोपडपट्टीत राहणाऱ्या ४० लाख लोकांसाठी २० लाख घरे बांधण्याचा निर्णय घेण्यात येऊनही आजतागायत फक्त दोन ते अडीच लाख घरे बांधण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील ६०० एसआरए योजना विविध कारणांमुळे प्रलंबित असल्याने विकासकाकडून भाड्याची रक्कमही मिळत नसल्याने योजनेच्या योग्य अंमलबजावणी अभावी रहिवाशांच्या जीविताचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक एसआरए इमारती दाटीवटीने बांधल्या असून अनेक ठिकाणी जिन्याखाली किंवा एखाद्या कोपऱ्यात इलेक्ट्रिक केबिन बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासानाने चौकशी करुन एसआरए योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात विस्तृत परिक्षण करुन योजनेत धोरणात्मक बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ज्या योजनांना आशय पत्र निर्गमित केले आहेत त्यांचा आढावा घेतला असता, अंदाजे २१९ योजना विविध कारणास्तव रखडलेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर २१९ योजनांपैकी २२ योजना ह्या न्यायालयीन प्रकरणामुळे तर २२ योजना ह्या विविध प्राधिकरणांचे ना-हरकत प्रमाणपत्रं प्राप्त न झाल्याने रखडलेल्या आहेत. त्यापैकी CRZ-II च्या ना-हरकती अभावी-१०, विमानपत्तन प्राधिकरणाच्या ना-हरकती अभावी-०१, MOEF च्या ना-हरकती अभावी -४ तर संरक्षण विभागाच्या ना-हरकती अभावी -०७ योजना रखडलेल्या आहेत.

सदर ना-हरकती प्राप्त करण्याकरीता संबंधित प्राधिकरणांकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच १६६ योजना हया विकासकांकडे अर्थसहाय्य उपलब्ध होत नसल्याने रखडलेल्या आहेत. तर ९ योजनांमधील विकासकांवर कलम १३(२) अंतर्गत कारवाई करण्यात आली असून संस्थेस नविन विकासकाची नियुक्ती करण्याबाबत मुभा देण्यात आली आहे.

या व्यतिरिक्त ५१७ योजना केवळ स्वीकृत झाल्यानंतर पुढील कोणत्याही परवानग्या प्राप्त न झाल्याने रखडलेल्या आहेत.

थकित भाड्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींकरीता प्रत्येक विभागामध्ये नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्यात आली आहे; जेणेकरुन थकित भाड्याबाबत तात्काळ कार्यवाही करून पात्र झोपडीधाराकांना भाडे प्राप्त होईल.

(४) हे खरे नाही.
(५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुनर्वसन इमारतीकरीता प्रकल्प नियोजन सल्लागार (PMC) व त्रयस्त पक्ष गुणवत्ता परिक्षक (TPQA) नेमणे विकासकास बंधनकारक आहे. सदर PMC व TPQA यांनी बांधकाम गुणवत्तेबाबतचा दाखला (Report) प्राधिकरणाकडे देणे आवश्यक आहे.

तसेच रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्याकरिता निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे, अभय योजना राबविणे तसेच MMR क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना संयुक्त भागीदारी (JV) तत्वावर राबविण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोंडगे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील यांडवा प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

**(९) * ७२७९० श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंडगे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजनेच्या बुडीत क्षेत्र यांडवा प्रकल्प आणि कालव्यासाठी करण्यात आलेल्या भूसंपादनात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणातील जमिन मध्यस्थांनी (एजन्ट) संबंधित अधिकाऱ्यांसमवेत संगनमत करुन भरमसाट मोबदला घेतल्याची तक्रार कोंडगे येथील ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, राजापूर यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असून जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत कोणालाही मोबदला वाटप करु नये अशी मागणी देखील करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांना भुसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देवून संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) कोंडगे, ता.लांजा येथील धरणग्रस्त श्री. गंगाधर सिताराम कोंडगेकर यांनी दि.०२.०८.२०२३ रोजीच्या अर्जान्वये उप विभागीय अधिकारी, राजापूर कार्यालयाकडून प्रसिध्द झालेली धरणग्रस्तांची मोबदला वाटप संविभाजन यादीमध्ये तफावत असल्याबाबत हरकत घेऊन कोंडगे येथील सर्व धरणग्रस्तांची मोबदला वाटप रक्कम थांबविण्याची विनंती केली आहे. परंतु, सदर हरकत अर्जामध्ये गट नंबर, खातेदाराचे नाव, मोबदला स्थगितीचे कारण नमूद न करता मोघम स्वरुपाच्या हरकती नमूद केलेल्या असल्याने सर्वच धरणग्रस्तांचा मोबदला थांबविणे उचित होणार नाही. यास्तव, सदर मोबदला वाटपास हरकत असल्यास सर्व्हे नं. नमूद करून हरकत घेणेबाबत श्री.कोंडगेकर यांना उपविभागीय अधिकारी, राजापूर कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी, राजापूर कार्यालयाकडून भूसंपादन मोबदला वाटपाबाबत हरकत प्राप्त झाल्यास त्यावर सुनावणी घेऊन मोबदला वाटपाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येतो. उक्त प्रकल्पाच्या अनुषंगाने सर्व्हे नं. नमूद असलेले एकूण १८ हरकत अर्ज उपविभागीय अधिकारी, राजापूर कार्यालयास प्राप्त झाले असून त्यावर सुनावणीची प्रक्रिया चालू आहे. त्यामुळे सदर हरकत अर्जापैकी कोणताही मोबदला अदा करण्यात आलेला नाही.

लघु पाटबंधारे योजना कोंडगे, हितसंरक्षण समिती मु.पो.कोंडगे, ता.लांजा यांनी कोंडगे धरणग्रस्तांचा मोबदला देणेबाबत दि.०९.०८.२०२३ रोजी निवेदन दिले आहे. लघुपाटबंधारे योजना, कोंडगे या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या निवाड्याची रक्कम रु.४,८५,६३,५०३/- असून एकूण खातेदार २८१ आहेत. त्यापैकी ज्या गट नंबरमध्ये कोणतीही हरकत प्राप्त नाही अशा ४३ खातेदारांना दि.१४.०९.२०२३ रोजी रक्कम रु.५४,७१,२३१/- मोबदला धनादेशाद्वारे अदा करण्यात आला आहे. तसेच ज्या सर्व्हे नंबर मध्ये हरकती प्राप्त नाहीत, त्या सर्व्हे नंबरचे मोबदला वाटप करण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, राजापूर कार्यालयामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडके (जि.जळगांव) येथील कै. यशवंतराव बळीराम पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित (तळई) अनाथ मुला-मुलींच्या बालगृह व वस्तीगृहात केअरटेकरने मुलींवर केलेले अत्याचार

**(१०) * ७४४६४ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडके (जि.जळगांव) येथील कै. यशवंतराव बळीराम पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित (तळई) अनाथ मुला-मुलींच्या बालगृह व वसतीगृहात नऊ मुलींवर दोन वर्ष सातत्याने लैंगिक अत्याचार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी केअरटेकर, अधिक्षिका व संस्था सचिव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन आरोपींना कठोर शिक्षा तसेच अशा घटनांना आळा घालण्याच्या दृष्टिने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी एरंडोल पोलीस स्टेशन येथे दोन गुन्हे दाखल असून एकूण ६ मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
(२) सदर गुन्ह्यात केअरटेकर, अधिक्षीका तसेच इतर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) गु. र. क्र. १४७/२०२३, भादवि कलम ३५४, ३७६(२)(ड)(एन)(क), ३७७ सह पोक्सो कलम ३, ४, ५, ६, ८, ९, १०, १२, १९, २१ सह अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(१)(अ)(ई)(व्ही)(डब्ल्यु) अन्वये दिनांक २६.०७.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून दिनांक ०४.१०.२०२३ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

गु. र. क्र. १५५/२०२३, भादवि कलम ३७६(२)(एन)(क), ३५४, ३२४, ३२३, ५०६ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ५(फ)(एल)(ओ), ६, ८, ९(फ)(एल)(ओ), १९, २१ सह बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम सन २०१५ चे कलम ८२ अन्वये दिनांक ०३.०८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, २०१५ चे कलम ३(१)(अ)(ई)(व्ही)(डब्ल्यु) अन्वये वाढीव कलम लावण्यात आली असून दिनांक २७.०९.२०२३ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पोलीस घटकांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देण्यात येतात. अशा घटना रोखण्यासाठी पायी गस्त, शाळा कॉलेजच्या परिसरात करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, नाकाबंदी, शाळा कॉलेजमधील विद्यार्थीनींना कायद्यातील तरतुदीबाबत मार्गदर्शन यासारख्या अनेक उपाययोजना करण्यात येतात. पोलीस काका/पोलीस दिदी हे शाळा, महाविद्यालये येथे भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये महिला व बालकांवरील अत्याचाराबाबत जागृती करत आहेत. तसेच विद्यार्थ्यांचे संरक्षक, मित्र व मार्गदर्शक म्हणून कार्य करत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईमध्ये अनधिकृत नर्सिंग होमच्या माध्यमातून बालकांची होत असलेली विक्री**

**(११) * ७२०५२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये अनधिकृत नर्सिंग होमच्या माध्यमातून बालकांची विक्री करणाऱ्या बोगस डॉक्टर व एजंटसह पाच महिलांना ट्रॉम्बे पोलिसांनी अटक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, वरळीतील रहिवाशी असलेली ज्युलिया फर्नांडीस ही ‘अहम’ नावाची स्वयंसेवी संस्था चालवत असून संस्थेच्या माध्यमातून तसेच आयव्हीएफ सेंटरसोबत संगनमत करून मुंबईत ७ ते १० लाखांत नवजात बालकांच्या विक्रीचे रॅकेट चालवत होत्या तसेच गत वर्षीही त्यांना १७ दिवसांच्या बालकांची विक्री करताना रंगेहाथ पकडले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वडाळा आणि मानखुर्दमधील बाळ चोरीच्या प्रकरणातही फर्नांडीसचा सहभाग समोर आला असल्याने त्यांच्या विरोधात ॲंटॉप हिल पोलिस ठाण्यामध्ये तिसरा गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ७ गुन्हे दाखल आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ‘अहम’ संस्थेवर व राज्यात नवजात बालकांची अवैधरित्या विक्री करणाऱ्या इतर सस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर चोरी प्रकरणी ज्युलिया फर्नांडीस या महिलेचा सहभाग निष्पन्न झाला असून तिच्या विरुद्ध अँटॉप हिल पोलीस स्टेशनमध्ये एक गुन्हा दाखल असून इतर विविध ६ ठिकाणी गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. सदरच्या बहुतांश गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. काही प्रकरणी आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे आणि उर्वरीत दाखल गुन्ह्यांमध्ये अधिक तपास करण्यात येत आहे.
(४) बोगस महिला डॉक्टर आरोपी सायराबानो शेख ही चालवत असलेले क्लिनीक संबंधित वैद्यकीय अधिकारी, एम.ईस्ट वॉर्ड यांनी सील केले असून ज्युलिया फर्नांडीस चालवत असलेल्या “अहम” संस्थेची नोंदणी रद्द करण्यासाठी पोलीसांकडून अतिरीक्त धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेडच्या मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांकडे आक्षेपार्ह वस्तू आढळल्याबाबत

**(१२) * ७६८२३ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांकडे नशेचे पदार्थ व मोबाईल इ. अवैध वस्तू आढळून आल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कैद्यांकडे या वस्तू संबंधित तुरुंग अधिकारी व शिपाई देत असल्याचे प्राथमिक माहितीमध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांच्या दक्षता पथकाने दि.०८.०९.२०२३ रोजी नांदेड जिल्हा कारागृहात घेतलेल्या विशेष झडतीमध्ये रु.२२५/- इतकी रक्कम, नेलकटर, एक नग पेनड्राईव्ह, तीन नग जिलेट ब्लेड (युज ॲण्ड थ्रो) या वस्तू मिळून आल्या आहेत. तथापि, नशेचे पदार्थ अथवा मोबाईल अशा कोणत्याही वस्तू आढळून आलेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) सदरहू प्रकरणात कैद्यांकडे आढळलेल्या अवैध वस्तु कारागृहातील अधिकारी/कर्मचारी यांच्या कसुरीमुळे आढळून आल्या आहेत. याबाबत कारागृहातील संबंधीत तुरुंगाधिकारी श्रेणी-१, तुरुंगाधिकारी श्रेणी-२ व चार कारागृह शिपाई यांना अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, पुणे यांनी दि.०६.१०.२०२३ रोजीच्या आदेशाव्दारे निलंबित केले असून कारागृह अधीक्षक यांचे बदलीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंतप्रधान आवास योजनेसाठी बोगस पदवीधारक अभियंता, व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी, संगणक शिक्षिका आणि लिपिक यांची नियुक्ती केल्याबाबत

**(१३) * ७२०७५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंतप्रधान आवास योजनेसाठी गृहनिर्माण विभागाने तांत्रिक सल्लागार म्हणून बोगस पदवीधारक अभियंता, व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी, संगणक शिक्षिका आणि लिपिक यांची नियुक्ती केल्याचे दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने निश्चित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अन्य शर्तीचे उल्लंघन करुन या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे :** (१) अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात व प्रसार माध्यमांत प्रसिध्द करण्यात आली होती.
(२) व (३)

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार (SLTC) ची नियुक्ती म्हाडा मार्फत करण्यात आली असल्याने म्हाडाने चौकशी समिती गठीत केली होती. म्हाडा प्राधिकरणांतर्गत नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल दि.०४.१२.२०२३ रोजी शासनास प्राप्त झाला असून सदर अहवाला संदर्भात संस्करण सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सारडा विद्यालय (जि.अहमदनगर) येथील मुख्याध्यापक यांच्यावर करण्यात आलेला प्राणघातक हल्ला

**(१४) * ७२३७८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ञ आणि अहमदनगर येथील सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.हेरंब कुलकर्णी यांचेवर दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास गुंडांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या सारडा विद्यालयासमोर असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या अतिक्रमित टपऱ्या तसेच बेकायदा वाहने हटविण्याबाबत श्री. कुलकर्णी यांनी महापालिकेकडे केलेल्या तक्रारीवरुन, त्यांचेवर प्राणघातक हल्ला झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हल्ला होऊन दोन दिवसांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही अहमदनगर पोलिसांकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानंतर सदर हल्ल्यातील ५ पैकी ३ आरोपींना अटक केली असून २ आरोपी अद्याप फरार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी विशेष तपास पथकाद्वारे चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अटकेतील व फरार आरोपींवर तसेच पोलीस विभागातील संबंधित जबाबदार अधिकारी यांचेवर कारवाई करुन श्री.कुलकर्णी यांना पोलिस संरक्षण देऊन विद्यालय परिसरात पोलिस बंदोबस्त देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

सारडा विद्यालय, अहमदनगरच्या समोर असलेल्या तंबाखुजन्य पदार्थाच्या बेकायदेशीर टपऱ्या हटविण्याबाबत श्री. हेरंब कुलकर्णी, मुख्याध्यापक, सारडा विद्यालय यांनी दिलेल्या तक्रारीमुळे विद्यालयासमोर आरोपींनी त्यांच्यावर राग धरुन दि.०९ ऑक्टोबर, २०२३ रोजी हल्ला केला.

(३) व (४) खरे नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पो. ठाणे येथे गु.र.नं.१४७४/२०२३ भा.दं.वि. कलम ३४१, ३२४, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी तसेच प्रत्यक्ष साक्षीदार यांच्या जबाबावरुन व उपलब्ध पुराव्यावरुन सदर गुन्ह्यात भा.दं. वि. कलम ३०७ ची वाढ करण्यात आली. सदर गुन्ह्यामध्ये पाचही आरोपींना अटक करण्यात आली असून यात एक विधीसंघर्षित बालक आहे. उर्वरित चारही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असल्याने कोणीही आरोपी फरार नाही.

(५) सदर प्रकरणी विशेष तपास पथकाद्वारे चौकशी करण्याबाबतची मागणी करणारे निवेदन संचालक, व्यवस्था सुधारणा मोहिम (SYSCOM) या संस्थेकडून मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्यात आलेले आहे.

(६) सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीसांमार्फत कसूर केलेली नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.

तसेच सदर घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी श्री.हेरंब कुलकर्णी, यांना ०१ सशस्त्र पोलीस अंमलदार संरक्षणकामी नियुक्त करण्यात आला असून विद्यालय परिसरात योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महापालिका (जि.पालघर) हद्दीत बनावट कागदपत्रांद्वारे बांधलेल्या अनधिकृत इमारतींबाबत

**(१५) * ७२६८९ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महापालिका क्षेत्रात महानगरपालिका, जिल्हाधिकारी, सिडको, दुय्यम निबंधक कार्यालय, वास्तुविशारद यांचे शिक्के व लेटरहेडची नक्कल करुन बनविलेल्या बनावट कागदपत्रांच्या आधारे जवळपास ५५ अनधिकृत इमारती बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारती अनधिकृत असल्याचे माहीत असूनही वसई-विरार महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.नगरविकास मंत्री यांना दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्र देऊन कारवाई करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणांची चौकशी करुन फसवणूक झालेल्या सदनिकाधारकांना मदत करुन संबंधित विकासक व अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशाप्रकारे ७८ अनाधिकृत इमारती बांधल्या असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) व (३) अशाप्रकारची तक्रार प्राप्त झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर तक्रारीवर शासन स्तरावर नियमोचित कार्यवाही सुरू आहे.

(४) वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार त्यांच्या अधिनस्त विविध प्रभागांतर्गत बनावट कागदपत्रे / शिक्के वापरुन आढळून आलेल्या इमारती संबंधित अनधिकृत बांधकाम व्यवसायिकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील कायदेशिर कार्यवाही सुरु आहे. तसेच, अशा प्रकारच्या प्रवृत्तीनां आळा घालण्यासाठी महानगरपालिकेकडून विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील अविकाज सेक्युअर इन्व्हेस्टेमेंट आणि अविकाज एंटरप्राईज कंपनीने जादा दराने परतावा देण्याचे अमिष दाखवून ग्राहकांची केलेली फसवणूक**

**(१६) * ७७०९५ श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि. कोल्हापूर) येथील अविकाज सेक्युअर इन्व्हेस्टमेंट आणि अविकाज एंटरप्राईज कंपनीने जादा दराने परतावा देण्याचे अमिष दाखवून नागरिकांना ५० लाखांना फसविले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फसवणूक झालेल्या व्यक्तींना दिलासा देवून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी गुंतवणूकदारांची रु.५० लाखाची फसवणुक झाली असल्याने याप्रकरणी हातकणंगले पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं.४७१/२०२३ भा.दं.वि. कलम ४०६, ४२० प्रमाणे दि.२४.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपी निष्पन्न झाले असून १ आरोपीस अटकपुर्व जामीन मंजूर झाला आहे. दुसरा आरोपी फरार असून त्याचा शोध घेणे सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महावितरणच्या सर्व्हरमधून वीज ग्राहकांची माहिती चोरून ग्राहकांची होत असलेली आर्थिक फसवणूक**

**(१७) * ७५५२१ श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन व ॲपद्वारे वीज देयक भरणाऱ्या ७० टक्के वीज ग्राहकांच्या नावापासून ते मोबाईल क्रमांक, वीज वापर, मासिक वीज बिल, भरणा केलेले बिल, थकीत बिल, संबंधित ग्राहकांच्या बँक खात्याच्या माहितीसह महत्वपूर्ण माहिती महावितरणच्या सर्व्हरमधून लिक होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लिक होत असलेल्या माहितीच्या आधारे ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असून त्यांच्या खात्यामधून पैसे वळविण्याचे प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहकांना दिलासा व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, महावितरण कंपनीच्या वीज ग्राहकांना आर्थिक फसवणूक करण्याच्या हेतूने बनावट संदेश (SMS) येत असल्याचे निर्देशनास आले आहे. सदर संदेशामध्ये ग्राहकांचा वैयक्तिक तथा वीज बिलासंबंधित कोणताही तपशील आढळून आलेला नाही.

(३) महावितरण कंपनीने केलेल्या चौकशीनुसार, सायबर गुन्हेगारांमार्फत ग्राहकांना बनावट संदेश पाठविण्यात येतो. सदर गुन्हेगारांनी पाठविलेल्या वैयक्तिक मोबाईल नंबरवर ग्राहकांनी संपर्क साधला तर त्यांच्याकडून ग्राहकाच्या कॉम्प्युटर किंवा मोबाईलचा ताबा घेता येईल असे एनीडेस्क किंवा तत्सम ॲप वीज ग्राहकास डाऊनलोड करण्यास सांगितले जाते किंवा एखादी बनावट लिंक ग्राहकास पाठविली जाते. त्याचा वापर करुन सायबर गुन्हेगार ग्राहकाची बॅंकेविषयीची गोपनीय माहिती चोरुन फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

महावितरण कंपनीमार्फत कंपनीची वेबसाईट, कंपनीचे ॲप, सोशल मिडिया, संदेश (SMS) आणि बातम्यांव्दारे ग्राहकांना बनावट संदेशाद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सतर्क करण्यासाठी आक्रमक मोहीम सुरु केली आहे. तसेच, महावितरणच्या ग्राहक सेवा केंद्रामार्फत ग्राहकांना बनावट संदेशाला प्रतिसाद न देण्याबाबत सूचना देण्यात येत आहे. तसेच, महावितरणमार्फत पोलीस महानिरीक्षक (महाराष्ट्र सायबर विभाग) यांना दि.२९.०६.२०२२ रोजीच्या पत्रांन्वये आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटनांसदर्भात कळविण्यात आले आहे. याशिवाय, महावितरण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रेस नोटव्दारे बनावट संदेशास प्रतिसाद न देण्याचे आवाहन केले आहे.

महावितरण कंपनीमार्फत ऑनलाईन गैरव्यवहार करणाऱ्या टोळीकडून वीज ग्राहकांची फसवणूक होऊ नये याकरिता प्रादेशिक सायबर पोलीस स्टेशन (बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स), मुंबई येथे एफ.आय.आर.क्र.०४/२२ दाखल केली आहे. तसेच, महावितरणच्या सर्व प्रादेशिक कार्यालयांतर्फे गृह मंत्रालय, केंद्र सरकारव्दारा संचलित राष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टलवर विविध तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

महावितरण कंपनीच्या विविध कार्यालयांनी संबंधित पोलीस स्टेशनला तक्रारी दाखल केल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने मुंबई सायबर पोलीसांनी झारखंड राज्यातील २ आरोपींना अटक केली होती व इतर २ आरोपींचा मा.सत्र न्यायालय, मुंबई यांनी अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे. मुंबई सायबर पोलीसामार्फत गुन्हयातील अटक केलेल्या २ आरोपींविरोधात सबळ पुरावे गोळा करुन पुढील कारवाई सुरु आहे. तसेच, इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) आधारे तरुणींची अश्लिल छायाचित्रे तयार करून प्रसारित केल्याबाबत

**(१८) * ७३९२१ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (प.) (ता.वसई, जि.पालघर) येथे राहणाऱ्या जीत निजाई आणि यश निजाई या तरुणांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) आधारे तरुणींची अश्लिल छायाचित्रे बनवून अश्लिल संकेत स्थळांवर (पॉर्न साईट) प्रसिद्ध केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असा गुन्हा घडलेल्या एकूण २३ पीडित मुली समोर आल्या असून या मुलींची छायाचित्रे अश्लिल संकेत स्थळांवर प्रसिद्ध झाल्यामुळे यासाठी आंतरराष्ट्रीय भ्रमणध्वनी येत असल्याने या पीडीत मुलींना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पीडीत तरुणी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यास गेल्या असता पोलिसांनी तक्रार घेण्यास नकार दिला असनू या तरुणींनी ही तक्रार मा.पंतप्रधान आणि मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी व्यक्ती तसेच संबंधित पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर गुन्हयातील आरोपीने ज्या मोबाईल मध्ये फिर्यादी व इतर मुलींचे मॉर्फ केलेले फोटो तयार केलेले आहेत तो मोबाईल फोन आरोपीकडुन जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीने स्वतःच्या मोबाईल मध्ये केवळ नऊ फोटो मॉर्फ केलेले असून ते व्हायरल झाल्याबाबत तपासामध्ये आढळून आलेले नाही.

(३) सदर प्रकरणी अर्नाळा पोलीस ठाणे, मिरा-भायंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे दिनांक २२.०८.२०२३ रोजी गु.र.क्र.२८५/२०२३ भा.दं.वि. कलम ३५४(क), ३२३, ५०४, ५०६, ३४ सह बालकांचे लैंगिक अत्याचारा पासून संरक्षण २०१२ चे कलम १४(१), १५ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६७, ६७ (अ), ६७ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुर्ण तपास करून दोन आरोपी विरूध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल केले आहे. सदरचा गुन्हा हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रोळी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीवर केलेले अत्याचार

**(१९) * ७२०८१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी येथील टागोर नगर महानगरपालिकेच्या पब्लिक हायस्कूलमध्ये श्री.सौरव उचाटे या क्रीडा शिक्षकाने दुसरी मध्ये शिकणाऱ्या ३ ते ४ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शिक्षकावर गुन्हा नोंदवून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शाळेमध्ये अशा घटना भविष्यात घडू नये यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ४१२/२०२३, भादवि कलम ३७६, ३७७ सह पोक्सो कायदा, २०१२ कलम ४, ६, ८, १२ तसेच गु.र.क्र. ४१३/२०२३, भादवी कलम ३७६, ३७७ सह पोक्सो कायदा, २०१२ कलम ४, ६, ८, १२ अन्वये असे दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच सदर दोन्ही गुन्ह्यांत मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी निर्भया पथकातील महिला अधिकारी / अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीतील शाळेत जाऊन शिक्षक, मुले / मुली तसेच परिसरातील महिलांना एकत्रित करून कॉर्नर मिटींगद्वारे स्वसंरक्षणाबाबत घ्यावयाची काळजी तसेच बालकांचे लैंगिक शोषन याबाबत मार्गदर्शन करतात. तसेच छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पोलीस घटकांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देण्यात येतात. अशा घटना रोखण्यासाठी पायी गस्त, शाळा कॉलेजच्या परिसरात करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, नाकाबंदी, शाळा कॉलेजमधील विद्यार्थीनींना कायद्यातील तरतुदीबाबत मार्गदर्शन यासारख्या अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. पोलीस काका / पोलीस दिदी हे शाळा, महाविद्यालये येथे भेटी देऊन विद्यार्थ्यामध्ये महिला व बालकांवरील अत्याचाराबाबत जागृती करत आहेत. तसेच विद्यार्थ्यांचे संरक्षक, मित्र व मार्गदर्शक म्हणून कार्य करत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे पानवण (ता.माण, जि.सातारा) येथे एका महिलेसह**
**अल्पवयीन मुलीस केलेली मारहाण**

**(२०) * ७३४३५ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पानवण (ता.माण, जि.सातारा) येथील पशुधन चाऱ्यासाठी दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरुन दलित महिला तसेच अल्पवयीन मुलासह फरफटत आणत अमानुषपणे मारहाण केल्याप्रकरणी चार व्यक्तींना पोलिसांनी दिनांक ३० ऑगस्ट,२०२३ रोजी अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोपींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पशुधन चाऱ्यासाठी दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरुन दलित महिलेस अल्पवयीन मुलासह मारहाण केल्याप्रकरणी ५ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर प्रकरणी दि.२६.०८.२०२३ रोजी म्हसवड पोलीस स्टेशन, जि.सातारा येथे गु.र.क्र.२७२/२०२३, भा.द.वि.स. कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९ सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा कलम ३(१)(r), ३(१)(s), ३(२)(va), ६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपी अटक असून त्यापैकी ४ आरोपी जामीनावर आहेत. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आलापल्ली (जि.गडचिरोली) येथील महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता**
**यांना लाच घेताना झालेली अटक**

**(२१) * ७२३३० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आलापल्ली (जि.गडचिरोली) येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयातील कार्यरत उपकार्यकारी अभियंता, श्री.विनोद भोयर यांनी वीज ग्राहकाचे बंद पडलेले मीटर बदलवून देण्यासाठी ४० हजार रूपयांची लाच मागितली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोलीच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून लाच घेताना श्री.भोयर यांना रंगेहाथ पकडले असल्याचे दिनांक १८ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी दि.१७.१०.२०२३ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार श्री.विनोदकुमार भोयर, उपकार्यकारी अभियंता, आलापल्ली उपविभाग, गडचिरोली मंडळ, चंद्रपूर परिमंडळ यांना घरगुती मिटर फॉल्टी असल्याचे सांगून दंडाचे बिल कमी केल्याचा मोबदला म्हणून रुपये २० हजारांची लाच रक्कम स्विकारताना दि.१७.१०.२०२३ रोजी रंगेहात पकडले.
(२) व (३) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेल्या कारवाईच्या प्राथमिक अहवालानुसार श्री.विनोदकुमार भोयर, उपकार्यकारी अभियंता यांना महावितरणच्या दि. १८.१०.२०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या दृष्टिने महावितरणद्वारे समिती नेमण्यात आली आहे. कंपनीच्या प्रचलित नियमानुसार चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.